**डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर**
**करिअर कट्टा उपक्रमा अंतर्गत लघु उद्योजक फुलझाड /रोपवाटिका विक्रेते मुलाखत**
**दि. ६ सप्टेंबर २०२४**
**स्थळ- अलंकार चौक, नागपूर**
**अहवाल**


महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमा अंतर्गत **लघु उद्योजक फुलझाड / रोपवाटिका विक्रेत्याची** मुलाखत उपक्रम दि. ६ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आली. या उपक्रमात डॉ. आंबेडकर कॉलेजचे करिअर कट्टाचे संसदेतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

फुलझाड व्यावसायिक गणेश निकोसे यांचा अलंकार चौक नागपूर येथे हंगामी फुलझाडांचा लघु व्यवसाय आहे. हा व्यवसाय अत्यंत कमी भांडवलात सुरु करता येऊ शकतो. तसेच एका ठिकाणी बसून किंवा चालता फिरता सुद्धा व्यवसाय करता येतो असे सांगितले. ऋतुमानानुसार कोणती झाडे लावायची, झाडांची निगा कशी राखायची, कोणते खत वापरायचे, फवारणी चे प्रकार, इत्यादीबाबत सविस्तर माहिती दिली. नर्सरी च्या बाजूलाच झाडांच्या कुंड्या विकणारे व्यावसायिक होते. त्यांच्याकडून सुद्धा मुलांनी माहिती घेतली. विविध रंगाचे व जातींचे फुलझाडे बघून मन आनंदीत झाले. गुलाब, शेवंती, मोगरा, चमेली, चाफा, जास्वंद, कमळ, सोनचाफा इत्यादी फुल झांडाची लागवड व त्यांची निगा याबाबत माहित घेण्यात आली. याशिवाय काही वनस्पतीची माहिती विद्यार्थ्यांकडून घेण्यात आली. फुटपाथवर फुलझाड व्यवसाय सुरु असताना प्रशासनाचा काही त्रास आहे का? याबद्दलही प्रश्न विचारण्यात आले. तेव्हा गणेश निकोसे म्हणाले की. अनेकदा आम्हाला वाहतुकीच्या शिस्तीच्या नावाखाली बसण्यास मनाई करण्यात येते. शिवाय वाढत्या रहदारीमुळे स्वत;ला सुद्धा बसण्याची भीती वाटते. अशा स्थितीत या व्यवसायासाठी हक्काची जमीन असेल तर अधिक नफा मिळवून देणारा हा व्यवसाय आहे. असे या मुलाखती मधून विद्यार्थ्यांच्या लक्षात आले.

.यावेळी महाविद्यालयाच्या करिअर संसदेचे सर्व पदाधिकारी अभिषेक भुते, अवनी बनकर, हर्ष गणवीर, तनुश्री चौरपगार, निकिता मेश्राम, अंश भुते, प्रशिक बारसागडे, लिंटा टॉन्सन, धनश्री चोपडे इत्यादी विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी या व्यवसायाबद्दल विविध प्रश्न विचारले. एकूणच एक चांगला अनुभव विद्यार्थ्यां नी घेतला. शेवटी करिअर संसदेच्या मुलांनी गणेश निकोसे यांचे आभार मानले.

महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक म्हणून डॉ.विद्या चौरपगार व प्रा. विठ्ठल बोंदर यांच्या मार्गदर्शनात या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्या डॉ. भुवनेश्वरी मेहरे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.


महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती
तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या
"करिअर कट्टा"
हंगामी झाडांची माहिती उपक्रम
Plant shop
– " करीअर संसद "
डॉ. आंबेडकर महाविद्यालय , दीक्षाभूमी, नागपूर.
दि. ०६-०९-२०२४
वेळ - १२:००
स्थळ -अलंकार चौक,
नागपूर.


धन्यवाद
Shot on OnePlus
Abhishek.. | 6 September 2024 at 1:06 pm


Shot on OnePlus
Abhishek.. | 6 September 2024 at 1:05 pm


धन्यवाद
Shot on OnePlus
Abhishek.. | 6 September 2024 at 12:50 pm



